| | | | |
|---|---|---|---|
| MHWR010014252023 | खटला दाखल तारीख | | ०२.०९.२०२३ |
| | खटला नोंदणी तारीख | | ०२.०९.२०२३ |
| | खटला निकाल तारीख | | ०२.०५.२०२६ |
| | **कालावधी – ०२ वर्ष, ०८ महिने, ०० दिवस** | | |

| | |
|---|---|
| **सत्र न्यायाधीश, वर्धा यांचे न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी – हेमंत भ. गायकवाड)** | |
| **<u>सत्र मामला क्रमांक ६१/२०२३</u>** | **निशाणी क्रमांक – १२०.** |
| **सीएनआर क्रमांक –**<br>**एमएचडब्ल्यूआर०१००१४२५२०२३** | आरोप– भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत.<br>**प्रथम छापील खबर क्रमांक १३७/२०२३** |

**भाग 'अ'**
**(परिच्छेद ४४(१) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

| | | |
|---|---|---|
| **प्रथम खबरी अहवाल माहिती / गुन्हा आणि पोलीस ठाणे** | | |
| फिर्यादी/अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>द्वारा–पोलीस ठाणे अधिकारी, पोलीस ठाणे, सिंदी (रेल्वे), तालुका सेलू, जिल्हा वर्धा. |
| अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत | | **सरकारी अभियोक्ता,**<br>श्री. जी.व्ही. तकवाले |
| आरोपी | **१.** | **मुकिंदा बापुराव गायधने**<br>वय ५२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – वार्ड क्रमांक ७, बेघर वस्ती, सिंदी (रेल्वे), तालुका सेलू, जिल्हा वर्धा. |
| | **२.** | **रोशन मारोतराव गायधने**<br>वय २२ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी,<br>राहणार – नांदगांव झोपडपट्टी, हिंगणघाट तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा. |
| | **३.** | **निखील वासुदेव बालपांडे**<br>वय २८ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी, |

| | | |
|---|---|---|
| | | राहणार – नेताजी वार्ड, हिंगणघाट,<br>तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा. |
| | ४. | **कुमार चंद्रलाल उधवानी**<br>वय ४३ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – सिंधी कॉलनी लष्कर, ग्वाल्हेर, (मध्यप्रदेश) हल्ली राहणार – राजु काकडे याच्या भाडयाने घेतलेल्या घरात, म्हाडा कॉलनी, हिंगणघाट, तालुका हिंगणघाट, जिल्हा वर्धा. |
| | ५. | **सुरेखा मुकिंदा गायधने**<br>वय ४२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>राहणार – वार्ड क्रमांक ७, बेघर वस्ती सिंदी (रेल्वे), तालुका सेलू, जिल्हा वर्धा. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | | मुख्य लोक अभिरक्षक श्री. एस.पी.काशीकर, आरोपी क्रमांक १ व ५ करीता आणि श्री. एस.ए.वासेकर, आरोपी क्रमांक २ ते ४ तर्फे. |

**भाग 'ब'**

**(परिच्छेद ४४(२) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | १६.०५.२०२३ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | : | १६.०५.२०२३ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | २१.०८.२०२३ व ०२.०९.२०२३ |
| दोषारोपपत्र निश्चित दिनांक | : | ०१.०३.२०२४ |
| पुरावा सुरुवात दिनांक | : | १२.०१.२०२६ |
| कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविल्याचा दिनांक | : | २४.०४.२०२६ |
| युक्तिवादाची तारीख | : | ०२.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | : | लागू नाही. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ०२.०५.२०२६ |
| आरोपीच्या शिक्षेबाबतचा दिनांक | : | लागू नाही. |

# आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप पत्र निश्चित | दोषमुक्त केले किंवा शिक्षा सुनावली | शिक्षा काय दिली | अटक झाल्यापासून न्यायनिर्णय पर्यंत आरोपी कारागृहात होता काय? असल्यास कलम ४२८ फौ.प्र.सं. नुसार सुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुकिंदा बापुराव गायधने | १८.०५.२०२३ | ३०.०३.२०२४ | भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | नाही |
| २ | रोशन मारोतराव गायधने | १८.०५.२०२३ | १८.०१.२०२४ | भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | नाही |
| ३ | निखील वासुदेव बालपांडे | १८.०५.२०२३ | १४.१२.२०२३ | भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | नाही |
| ४ | कुमार चंद्रलाल उधवानी | १८.०५.२०२३ | २२.१२.२०२३ | भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत. | दोषमुक्त केले. | नाही | नाही |
| ५ | सुरेखा मुकिंदा गायधने | ०८.०७.२०२३ | ०७.११.२०२३ | भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ | दोषमुक्त केले. | नाही | नाही |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अंतर्गत. | | | |

## भाग 'क'
## (परिच्छेद ४४(३) प्रकरण ६ क्रिमीनल मॅन्यूअल)
## (अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी)

| अभियोग पक्षातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| साक्षीदार क्रमांक १ | सचिन गणेशराव वर्जे (निशाणी क्रमांक ९०) | जखमी साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक २ | रुपेश मोहन सारवान (निशाणी क्रमांक ९५) | पंच साक्षीदार |
| साक्षीदार क्रमांक ३ | स्मिता बिरजु बोरकर (निशाणी क्रमांक १०४) | तक्रार व छापील प्रथम खबर दाखल अधिकारी |
| साक्षीदार क्रमांक ४ | राजु मुरलीधर सोनपितळे (निशाणी क्रमांक ११३) | तपासी अधिकारी |

| आरोपीतर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| | नाही | नाही |

| न्यायालयातर्फे साक्षीदार | | |
|---|---|---|
| **साक्षीदार क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
| | नाही | नाही |

**(अभियोग पक्षातर्फे/आरोपीतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी)**

**'अ' – अभियोगपक्षातर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक पी.–१/सा.क्र.२ | मुख्याधिकारी, नगरपरिषद सिंदी (रेल्वे) यांना पंच साक्षीदार उपलब्ध करुन देण्याकरीता पाठविलेले |

| | | |
|---|---|---|
| | | पत्र. |
| २ | निशाणी क्रमांक पी.–२/सा.क्र.२ | पंच साक्षीदारांना पंच म्हणुन काम करण्याकरीता दिलेले सुचनापत्र दिनांक १६.०५.२०२३. |
| ३ | निशाणी क्रमांक पी.–३/सा.क्र.२ | आरोपी क्रमांक २ चा कबुलीजबाब. |
| ४ | निशाणी क्रमांक पी.–४ व ५/सा.क्र.२ | माल काढुन दिल्याचे दोन पंचनामे. |
| ५ | निशाणी क्रमांक पी.–६/सा.क्र.३ | आरोपी क्रमांक ५ ने दाखल केलेली तोंडी तक्रार. |
| ६ | निशाणी क्रमांक पी.–७/सा.क्र.३ | छापील प्रथम खबर अहवाल. |
| ७ | निशाणी क्रमांक पी.–८/सा.क्र.४ | दिनांक १७.०५.२०२३ रोजी, जखमीचे बयान नोंदविण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना जारी केलेले पत्र. |
| ८ | निशाणी क्रमांक पी.–९/सा.क्र.४ | दिनांक २२.०५.२०२३ रोजी, जखमीचे बयान नोंदविण्याकरीता वैद्यकीय अधिकारी यांना जारी केलेले पत्र. |
| ९ | निशाणी क्रमांक पी.–१०/सा.क्र.४ | जखमीचे बयान जे मृत्युपूर्व बयानाच्या नमुन्यात असुन त्याच्या हस्ताक्षरात नोंदविण्यात आलेले आहे. |
| १० | निशाणी क्रमांक पी.–११/सा.क्र.४ | दिनांक १७.०५.२०२३ रोजी, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जखमीचे कपडे आणि रक्ताचे नमुने मिळण्याकरीता जारी केलेले पत्र. |
| ११ | निशाणी क्रमांक पी.–१२ ते १५/सा.क्र.४ | आरोपी क्रमांक १ ते ४ यांचे अटक फॉर्म. |
| १२ | निशाणी क्रमांक पी.–१६/सा.क्र.४ | आरोपी क्रमांक ५ चा अटक फॉर्म. |
| १३ | निशाणी क्रमांक पी.–१७/सा.क्र.४ | वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, सिंदी (रेल्वे) यांना क्वेरी अहवाल मिळण्याकरीता जारी केलेले पत्र. |
| १४ | निशाणी क्रमांक पी.–१८/सा.क्र.४ | कलमवाढ केल्याबाबतचे पत्र. |
| १५ | निशाणी क्रमांक पी.–१९/सा.क्र.४ | वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, सेलु यांना आरोपींचे रक्ताचे नमुने जप्त करण्याकरीता जारी केलेले पत्र. |
| १६ | निशाणी क्रमांक पी.–२०/सा.क्र.४ | दिनांक २३.०५.२०२३ रोजी जप्त वस्तु प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, नागपूर यांना रासायानिक विश्लेषणाकरीता पाठविल्याबाबतचे पत्र. |
| १७ | निशाणी क्रमांक पी.–२१/सा.क्र.४ | दिनांक २३.०५.२०२३ रोजीची डयुटी पास. |

| | | |
|---|---|---|
| १८ | निशाणी क्रमांक पी.–२२/सा.क्र.४ | दिनांक २३.०५.२०२३ रोजीची ईनव्हाईस चालान. |
| १९ | निशाणी क्रमांक पी.–२३/सा.क्र.४ | दिनांक ०९.०६.२०२३ रोजी, पोलीस अधिक्षक, वर्धा यांना आरोपींचे मोबाईल फोनचे सी.डी.आर. आणि एस.डी.आर. मिळण्यासाठी पाठविलेले पत्र. |
| २० | निशाणी क्रमांक पी.–२४/सा.क्र.४ | दिनांक २०.०६.२०२३ रोजी, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू यांना आरोपींची ओळखपरेड करण्यासाठी जारी केलेले पत्र. |
| २१ | निशाणी क्रमांक पी.–२५/सा.क्र.४ | दिनांक ०१.०७.२०२३ रोजी, कार्यकारी दंडाधिकारी/तहसीलदार, सेलू यांना आरोपींची ओळखपरेड करण्यासाठी जारी केलेले पत्र. |
| २२ | निशाणी क्रमांक पी.–२६/सा.क्र.४ | कार्यकारी दंडाधिकारी/तहसीलदार, सेलू यांनी आरोपींचा ओळखपरेडचा अहवाल पत्र दिनांक २१.०७.२०२३ सह दिनांक २६.०७.२०२३ रोजी पाठविल्याचे पत्र. |
| २३ | निशाणी क्रमांक पी.–२७/सा.क्र.४ | वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जखमीचे कागदपत्र मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| २४ | निशाणी क्रमांक पी.–२८/सा.क्र.४ | वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना अंतिम जखमांचा अहवाल मिळण्याकरीता पाठविलेले पत्र. |
| २५ | निशाणी क्रमांक पी.–२९/सा.क्र.४ | सचिन वर्जे सा.क्र.१ याच्या दिनांक १५.०६.२०२३ रोजीच्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ'. |
| २६ | निशाणी क्रमांक पी.–३० ते ३५/सा.क्र.४ | एकूण ६ रासायनिक विश्लेषणाचे अहवाल. |

**'ब' – आरोपीतर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| | नाही | नाही |

**'क' – न्यायालयातर्फे –**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी क्रमांक सी–१ | जखमांचे प्रमाणपत्र. |
| २ | निशाणी क्रमांक सी–२ | पोलीस माहिती पत्रक. |
| ३ | निशाणी क्रमांक सी–३ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा घटनास्थळ |

| | | |
|---|---|---|
| | | पंचनामा. |
| ४ | निशाणी क्रमांक सी–४ | न्यायवैद्यक घटनास्थळ पंचनामा. |
| ५ | निशाणी क्रमांक सी–५ | जखमांचा अहवाल. |
| ६ | निशाणी क्रमांक सी–६ | प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेला वस्तु व नमुने पाठविल्याबाबतचा विहीत नमुन्यातील फॉर्म. |
| ७ | निशाणी क्रमांक सी–७ | दिनांक १७.०५.२०२३ रोजीचे जप्ती पत्रक. |
| ८ | निशाणी क्रमांक सी–८ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा मालमत्ता शोध व जप्तीचा नमुना. |
| ९ | निशाणी क्रमांक सी–९ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा मालमत्ता शोध व जप्तीचा नमुना. |
| १० | निशाणी क्रमांक सी–१० | दिनांक २२.०५.२०२३ रोजीचे जप्ती पत्रक. |
| १२ | निशाणी क्रमांक सी–११ | जखमीची रुग्णालयातुन सुट्टी झाल्याबाबतची समरी. |
| १३ | निशाणी क्रमांक सी–१२ | अंतिम जखमांचा अहवाल. |
| १४ | निशाणी क्रमांक सी–१३ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी कुमार चंद्रलाल उधवानी याच्याकडुन कपडे व मोबाईल जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |
| १५ | निशाणी क्रमांक सी–१४ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी रोशन मारोतराव गायधने याच्याकडुन मोबाईल जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |
| १६ | निशाणी क्रमांक सी–१५ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी निखील वासुदेव बालपांडे याच्याकडुन मोबाईल जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |
| १७ | निशाणी क्रमांक सी–१६ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी रोशन मारोतराव गायधने याच्याकडुन कपडे जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |
| १८ | निशाणी क्रमांक सी–१७ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी निखील वासुदेव बालपांडे याच्याकडुन कपडे जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |
| १९ | निशाणी क्रमांक सी–१८ | दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा आरोपी मुकिंदा बापुरावजी गायधने याच्याकडुन मोबाईल जप्त केल्याचा जप्ती पंचनामा. |

## 'ड' – महत्वाचे पुरावे –

| अनुक्रमांक | मुद्देमाल वस्तु क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १ | एम.ओ.क्रमांक १ | एक चाकू. |

## –न्यायनिर्णय–

(जाहीर दिनांक २ मे, २०२६)

यातील आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम १२०–ब, ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की,

सुरेखा मुकिंदा गायधने हिने दिनांक १६.०५.२०२३ रोजी, पोलीस स्टेशन, सिंदी (रेल्वे) येथे तक्रार दाखल केली की, दिनांक १५.०५.२०२३ रोजी, रात्री ९.०० वाजताच्या दरम्यान, ती व तिचा पती, जखमी सचिन वर्जे, समिर टेंभरे व मुले असे मिळुन एकत्र जेवण करुन झोपले होते. त्यावेळी पहाटे ४.३० वाजताच्या दरम्यान, तिचा पती मुकिंदा गायधने याला अचानक आवाज आला कोणी तरी आंगणात सचिनला मारपीट करीत आहे, त्यामुळे तिने पलंगावरुन उठुन पाहीले असता सचिन वर्जे झोपुन दिसला नाही, तिने दाराचे बाहेर पाहीले असता सचिन वर्जे याला दोन लोक मारपीट करीत होते. त्यापैकी एकाच्या हातात चाकूसारखी वस्तू होती. तिने त्यांना कशाला मारता असे म्हटले असता ते दोघेही पळुन गेले. त्यावेळी त्यांच्या तोंडाला दुपट्टे बांधुन होते. सचिन वर्जे हा खाली पडला होता व त्याचे डोक्यातुन व गळयातुन रक्त निघत असल्याने तिला त्याच्या गळयावर जबर मार दिसला. तिने आजुबाजूला जोरात आवाज मारुन समिर टेंभरे याला झोपेतुन उठवुन व बाजुला राहणारा महेश दहिलिंगे यांना आवाज मारला, ते दोघेही धावत आले. सचिनला दुखापत होवुन रक्त दिसल्याने तिने त्या दोघांना सचिनजवळ ठेवले व ताबडतोब सचिन वर्जेचा भाऊ पिंटु वर्जे याला फोन करुन सचिनला कोणी तरी दोन लोकांनी मारपिट करुन पळाले, असे सांगितले. तिने पोलीस स्टेशनला जावुन सचिन वर्जेला मारपिट केल्याबाबत माहिती दिली.

३. त्यानंतर तपासादरम्यान जखमी सचिन वर्जे याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ नुसार न्यायालयात दिनांक १७.०६.२०२३ रोजी, बयान नोंदविण्यात आले. सदर बयानात जखमीने गुन्हयात फिर्यादी असलेली आरोपी क्रमांक ५ सुरेखा गायधने हि सुध्दा सहभागी असल्याचे कथन करुन तिने त्याला उठवुन त्याची ईच्छा नसतांना घटनेवेळी घराच्या बाहेर पाठविल्याचे सांगितले. तसेच घराबाहेर गेल्यावर जखमीचे डोक्यावर आरोपींनी काचेच्या शिशीने हमला केल्यावर जीव वाचविण्यासाठी जखमी घरात जात असताना आरोपी क्रमांक ५ सुरेखा गायधने हिने घराचे दार बंद केल्याने जखमीला घरात जाता आले नाही. त्यामुळे बाहेर असलेल्या आरोपींनी जखमीला पकडुन जीवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने त्याचा चाकूने गळा कापला व घटनास्थळावरुन पळुन गेले. त्यामुळे गुन्हयातील फिर्यादी सुरेखा म्हणजेच आरोपी क्रमांक ५ हिला अटक करण्यात आली. पोलीस ठाणे, सिंदी (रेल्वे) येथे दिनांक १६.०५.२०२३ रोजी, गुन्हा रजिस्टर क्रमांक १३७/२०२३, भारतीय दंड संहितेचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि २०१ अन्वये (यापुढे **'संहिता'** असे संबोधिण्यात येईल) अन्वये आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला.

४. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक, राजु मुरलीधर सोनपितळे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान, त्यांनी घटनेच्या ठिकाणी जावुन आरोपी क्रमांक ५ ने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केला. त्यांनी घटनास्थळावरुन साधी माती, रक्तमिश्रीत माती, रक्ताचे नमुने, एक प्लॉस्टक खुर्ची आणि दारुची बाटली जप्त केली होती. दिनांक १७.०५.२०२३ रोजी, त्यांनी वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जखमीचा वैद्यकीय अहवाल मिळण्याकरीता पत्र पाठविले आणि त्यांच्याकडुन जखमीचा वैद्यकीय अहवाल प्राप्त केला. त्याच दिवशी, त्यांनी जखमीचे बयान नोंदविण्याकरीता पत्र जारी केले होते, त्यावर वैद्यकीय अधिकारी यांनी जखमी बयान देण्यास सक्षम नसल्याचे

मत/अभिप्राय नोंदविला होता. त्यानंतर दिनांक २२.०५.२०२३ रोजी, त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांना जखमीचे बयान नोंदविण्याकरीता पत्र जारी केले, त्यावर वैद्यकीय अधिकारी यांनी जखमी बयान देण्यास सक्षम असल्याचा अहवाल दिला आणि त्यानुसार जखमीचे मृत्यूपुर्व बयान त्याच्या हस्ताक्षरात नोंदविले.

५. पोलीस उपनिरीक्षक, राजु मुरलीधर सोनपितळे यांनी दिनांक १७.०५.२०२३ रोजी, वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना जखमीचे कपडे आणि रक्ताचे नमुने मिळण्याकरीता पत्र जारी केले आणि त्यानुसार जखमीचे कपडे आणि रक्ताचे नमुने पंचासमक्ष जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी दिनांक १८.०५.२०२३ रोजी आरोपी क्रमांक १ ते ४ यांना अटक नमुन्याद्वारे अटक केली आणि त्यांच्या अटकेबाबतची माहिती त्यांच्या नातेवाईकांना दिली. त्यानंतर, त्यांनी दिनांक ०८.०७.२०२३ रोजी, आरोपी क्रमांक ५ हिला, जखमी सचिन याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ अंतर्गतचे बयान दिनांक १७.०६.२०२३ रोजी नोंदविल्यानंतर अटक फॉर्मनुसार अटक केली. त्यांनी वेळोवेळी आरोपींचे मोबाईल हॅण्डसेट, कपडे आणि रक्ताचे नमुने जप्ती पंचनाम्यानुसार जप्त केले. त्यांनी आरोपी क्रमांक २ रोशनचा कबुलीजबाब दोन पंचासमक्ष नोंदविला. त्यांनी पंचासह आणि आरोपी क्रमांक २ सोबत पोलीस जीपने वणा नदीच्या पुलाखाली आरोपी क्रमांक २ ने दाखविल्यानुसार जावुन नदीत चाकूचा शोध घेतला, त्यांनी नदीत एका दगडावर चाकू सापडला, तो त्यांनी पंचासमक्ष जप्त केला आणि माल काढुन दिल्याचा पंचनामा तयार केला.

६. पोलीस उपनिरीक्षक, राजु मुरलीधर सोनपितळे यांनी अक्षय गायधने याच्याकडुन एक मोटरसायकल जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी आरोपी क्रमांक १ चा कार्बन कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांना क्वेरी अहवाल मिळण्याकरीता पत्र जारी केले

आणि त्यानुसार त्यांच्याकडुन क्वेरी अहवाल प्राप्त करुन घेतला. दिनांक २३.०५.२०२३ रोजी, त्यांनी जप्त वस्तु रासायनिक विश्लेषणाकरीता प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, नागपुर यांच्याकडे पाठविल्या आणि त्यानुसार त्यांच्याकडुन रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त केले. दिनांक ०९.०६.२०२३ रोजी, त्यांनी पोलीस अधिक्षक, वर्धा यांना आरोपींच्या मोबाईल फोनचे सी.डी.आर. आणि एस.डी.आर. मिळण्याकरीता पत्र पाठविले आणि त्यानुसार त्यांनी तत्संबंधीचे विवरण प्राप्त करुन घेतले. दिनांक २०.०६.२०२३ रोजी, त्यांनी न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू यांना आरोपींची ओळखपरेड करण्यासाठी पत्र पाठविले आणि परवानगीअंती कार्यकारी दंडाधिकारी/तहसीलदार, सेलू यांना पत्र पाठवुन त्यांच्याकडुन आरोपींचा ओळख परेड विषयीचा अहवाल प्राप्त करुन घेतला.

७. पोलीस उपनिरीक्षक, राजु मुरलीधर सोनपितळे यांनी वैद्यकीय अधिकारी, कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांना पत्र पाठवुन जखमीची वैद्यकीय कागदपत्रे मागविली व प्राप्त करुन घेतली. त्यानंतर, त्यांनी साक्षीदारांची बयाने त्यांच्या सांगण्यानुसार नोंदविली. तपासादरम्यान त्यांना एकूण ६ रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाले होते, ते अभिलेखावर सादर केले. त्यांनी तपासकाम पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरूध्द पुरेसा पुरावा प्राप्त झाल्याने त्यांच्याविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि २०१ अन्वये प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सेलू यांच्या न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

८. संहितेचे कलम ३०७ अन्वये दंडनीय असणा–या खटल्याचे कामकाज चालविण्याचे अधिकार केवळ सत्र न्यायालयास असल्याने, प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सेलू यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०७ ची पूर्तता करून सदरचा खटला चालविण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २०९ अन्वये सत्र न्यायालय, वर्धा यांच्याकडे दिनांक २५.०८.२०२३ रोजीच्या

आदेशान्वये वर्ग केला.

९. प्रस्तुत प्रकरणी आरोपी सत्र न्यायालयात हजर झाल्यानंतर दिनांक ०१.०३.२०२४ रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम १२०–ब, ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अन्वये दोषारोप (नि.क्र.५३) ठेवून आरोप निश्चित करण्यात आले. सदर दोषारोप आरोपींना वाचून दाखवून, त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यात आले. आरोपींनी त्याच्यावरील सर्व आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

१०. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणी एकूण ४ साक्षीदार तपासल्यानंतर, गुन्ह्यात गोवणा–या पुराव्याचे पुष्टीकरण घेण्याकरीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये आरोपींचे जबाब नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांना खोटया गुन्हयात गोवण्यात आल्याचा बचाव घेतला आहे.

११. निर्णयाकरीता उपस्थित झालेले मुद्दे, त्यावरील माझ्या निष्कर्षांसह खालीलप्रमाणे आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपींनी फौजदारीपात्र स्वरूपाचा कट रचून जखमीला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय? | नकारार्थी. |
| **२.** | आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी जखमीला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे अभियोगपक्ष शाबीत करतो काय ? | नकारार्थी. |
| **३.** | आरोपी क्रमांक २ ते ४ यांनी समान उद्देशाच्या पूर्ततेसाठी अपराध्याला शिक्षेपासून वाचवण्यासाठी गुन्हयातील रक्ताने माखलेले कपडे धुवून पुरावा नाहीसा करण्याची तजवीज केल्याचे अभियोगपक्ष | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | शाबीत करतो काय? | |
| ४. | आरोपींनी गुन्हा केला काय ? असल्यास कोणता ? | नकारार्थी. |
| ५. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## –– <u>का र ण मि मां सा</u> ––

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत</u> :–**

१२. उपरोक्त मुद्यांवरचा पुरावा एकसारखा आणि परस्परांशी निगडीत असल्यामुळे, त्यांना एकत्रितपणे विचारात घेतले जात आहे.

१३. आरोपींविरूध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे एकूण चार साक्षीदार तपासण्यात आले. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने जखमी सचिन गणेशराव वर्जे (सा.क्र.१) (नि.क्र.९०) याची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या साक्षीत असे सांगितले की, तो आरोपी क्रमांक १ व ५ यांना ओळखतो. मात्र, तो आरोपी क्रमांक २ ते ४ यांना ओळखत नाही. मे २०२३ मध्ये त्याला मारहाण झाल्याच्या घटनेची तक्रार कोणी नोंदविली ते त्याला माहीती नाही. त्याच्यावर कोणी हल्ला केला हे देखील त्याला माहीती नाही. त्याला घटनेबद्दल काहीही माहीती नाही. त्याने अभियोगपक्षाला पुर्णपणे सहकार्य न केल्यामुळे, त्याला उलटतपासणीमध्ये उत्तरसूचक स्वरूपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी अभियोगपक्षाला देण्यात आली.

१४. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात नकाराशिवाय काहीही निष्पन्न होवू शकले नाही. ईतकेच नव्हे तर त्याने दिनांक १५.०६.२०२३ रोजीच्या त्याच्या पोलीसांनी नोंदविलेल्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' त्याने बयान नोंदवितांना पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्याच्या उलटतपासणीमध्ये त्याने मान्य केले की,

मे २०२३ मध्ये, तो आरोपी क्रमांक १ च्या घरी दोन दिवस राहीला होता, जेव्हा त्याच्या मानेला दुखापत झाली तेव्हा तो आरोपी क्रमांक १ च्या घरात झोपला होता, तो दिनांक ०७.०६.२०२३ पावेतो रुग्णालयात दाखल होता आणि पोलीसांनी त्याचे बयान घेतले होते, त्याला आरोपींच्या ओळखपरेडसाठी तुरुंगात बोलविण्यात आले होते, त्याने ओळखपरेडमध्ये आरोपी क्रमांक ३ व ४ यांना ओळखले होते आणि त्याचे आरोपींशी सलोख्याचे संबंध आहेत. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्याच्या उलटतपासणीमध्ये त्याने मान्य केले की, ओळखपरेड चाचणीच्या आधी, त्याने वर्तमानपत्रात आरोपींचे छायाचित्र पाहीले होते आणि तो हल्लेखोरांना ओळखत नाही.

१५. जखमीने त्याच्या साक्षीत अभियोगपक्षाच्या खटल्यास पुष्टी मिळेल असे काहीही कथन केलेले नसून, घटनाच घडली नसल्याचे सांगितले आहे. अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उपरोक्त उलटतपासात जखमीकडून आरोपींविरूध्द वापरता येईल अशी कोणत्याही प्रकारची कबूली न्यायालयापुढे आणण्यात आलेली नाही. जखमीने अभियोगपक्षाला सहकार्य केलेले नाही आणि अभियोगपक्षाला त्याच्या उलटतपासणीत नकाराव्यतिरिक्त काहीही निष्पन्न होवू शकले नाही. त्यामुळे प्रस्तुत घटनेची आरोपींचा परस्परसंबंध दर्शविणारा किंवा प्रत्यक्ष सहभाग असल्याचा तथा अभियोगपक्षाचे कथनास पुष्टी देणारा पुरावा दिसून येत नाही. अशाप्रकारे, जखमीची साक्ष अभियोगपक्षाला आरोपींविरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी उपयोगी ठरत नाही. जखमीने स्वत:च अभियोगपक्षास समर्पक साक्ष दिलेली नसल्यामुळे, मूळ तक्रार संशयापलिकडे सिध्द झाली असे म्हणता येणार नाही.

१६. जरी तपासी अधिकारी राजु मुरलीधर सोनपितळे (सा.क्र.४) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये जखमी सचिन वर्जे (सा.क्र.१) याच्या बयानामधील अधोरेखांकित भाग 'अ' त्याने पोलीसांना बयान नोंदवितांना सांगितला असल्याचे सांगुन सदरहु

अधोरेखांकित भाग (नि.क्र.२९/सा.क्र.४) अनुसार सिध्द केले असले तरीही जखमीने तो त्याच्या पुराव्यात स्पष्ट शब्दात नाकारलेला आहे. त्यामुळे, या जखमीचा पुरावा अभियोग पक्षास पुरक ठरणारा नाही.

१७. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने पंच साक्षीदार रुपेश मोहन सारवन (सा.क्र.२) (नि.९५) याची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या साक्षीत त्याच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.सी.–३) करण्यात आला व पंचनाम्यातील ठिकाण एका महिलेने दाखविले असुन न्यायवैद्यकीय नमुने त्याचे समक्ष जप्त केल्याचे कथन केलेले आहे. बचावपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये त्याच्या कार्यालयातील हलचल नोंदवहीविषयीची सूचना मान्य करुन त्याचा उतारा अभिलेखावर नसल्याचे कबूल केलेले आहे. तर तपासी अधिकारी राजु मुरलीधर सोनपितळे (सा.क्र.४) (नि.११३) यांची साक्ष घटनास्थळ पंचनाम्यासंबधाने घटनेचे ठिकाण, घर किंवा आंगण, घटनेच्या ठिकाणावरील घराची मालकीचे दस्त, अन्य प्रत्यक्षदर्शी नसलेले साक्षीदार याविषयीची तफावत तपासी अधिकारी व पंच साक्षीदार यांच्या पुराव्यात घटनास्थळ पंचनाम्याचे अनुषंगाने असल्याचे दिसुन येते. विशेष म्हणजे, सदरचा घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.सी.–३) बचावपक्षातर्फे मान्य करण्यात आलेला आहे.

१८. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने पंच साक्षीदार रुपेश मोहन सारवान (सा.क्र.२) (नि.९५) याची साक्ष नोंदविली. त्याने त्याच्या साक्षीत असे सांगितले की, दिनांक १९.०५.२०२३ रोजी, त्याला पोलीस स्टेशनला बोलविण्यात आले. आरोपी क्रमांक २ कबुलीजबाब देण्यास तयार होता. आरोपी क्रमांक २ लॉकअपमध्ये होता, त्याला लॉकअपच्या बाहेर काढण्यात आले. त्याने उघड केले की, गुन्हयात वापरलेला चाकु दाखविण्यास तो तयार आहे, जो त्याने फेकुन दिला आहे. त्यानुसार पोलीसांनी निवेदन पंचनामा तयार केला. त्यानंतर, तो, अन्य पंच,

पोलीस आणि आरोपी क्रमांक २ असे पोलीस वाहनाने निघाले, मार्ग आरोपी क्रमांक २ ने दाखविला, तो त्यांना चंद्रपुर रस्त्यावरील कांढळी नदीवर घेवुन गेला, जेथे त्याने चाकु फेकला होता, ते गाडीतुन उतरले. आरोपी क्रमांक २ त्यांना नदीमध्ये घेवुन गेला, ती कोरडी नदी होती. आरोपी क्रमांक २ ने शोध घेतला आणि गवतामधुन एक चाकु काढुन दिला. पोलीसांनी सदर चाकु जप्त केला आणि छायाचित्र घेतले. त्यानुसार, पोलीसांनी दोन पंचनामे तयार केले. त्याने सदर चाकू आर्टीकल एम.ओ.क्र.१ ओळखला. त्याने छायाचित्र एकुण ७ आर्टीकल–बी ओळखले.

१९. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्याच्या उलटतपासणीमध्ये हलचल नोंदवहीविषयीची सूचना मान्य केलेली आहे. तसेच पुढे पोलीसांनी त्याला नगरपरिषद कार्यालयात सांगितले होते की, त्यांना आरोपी क्रमांक २ कडुन चाकू जप्त करायचा आहे, ही बाब देखील त्याने मान्य केलेली आहे. त्याचप्रमाणे, तो व पोलीस पुढील बाजूस बसले होते आणि आरोपी पोलीसांच्या वाहनात मागच्या बाजूस बसला होता, ही बाब देखील मान्य केलेली आहे. पोलीसांनी त्याच्या कार्यालयातुन त्याचा उतारा घेतला आहे कि नाही, हे त्याला माहिती नाही. त्यावेळी, आरोपी क्रमांक २ ला दोरीच्या सहाय्याने हातकडी घालण्यात आली होती. पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे की, ते कांढळी नदीकडे गेले. पंचनाम्यात असेही नमूद करण्यात आले आहे की, चाकू गवतातून काढून देण्यात आला होता. सदर बाबी पंचनाम्यात का नमूद करण्यात आल्या नाहीत याचे कोणतेही कारण तो सांगु शकत नाही.

२०. उपरोक्त मुद्यांसंदर्भात अभियोगपक्षाने तपासी अधिकारी राजु मुरलीधर सोनपितळे (सा.क्र.४) (नि.११३) याची साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षीत सांगितले की, दिनांक १९.०५.२०२३ रोजी, त्यांनी आरोपी क्रमांक २ रोशनचा कबुलीजबाब नोंदविला. आरोपी क्रमांक २ ने कबुलीजबाब दिला की, तो गुन्हयात वापरलेला चाकू काढुन देण्यास तयार आहे. त्यानुसार त्यांनी कबुलीजबाब तयार

केला. त्याआधारे, ते पंचांसह, पोलीस कर्मचारी असे आरोपीच्या सांगण्यानुसार गुन्हयातील हत्यार शोध पंचनाम्याकरीता पोलीस जीपने वणा नदीच्या पुलाखाली आरोपी क्रमांक २ ने दाखविल्यानुसार गेले.

२१. तपासी अधिकारी राजु मुरलीधर सोनपितळे (सा.क्र.४) यांनी पुढे कथन केले की, त्यानुसार त्यांनी सदरच्या वणा नदीच्या पुलाखाली आरोपी क्रमांक २ ने दाखविल्यानुसार जावुन नदीत चाकूचा शोध घेतला. त्यांना नदीतील एका दगडावर एक चाकू सापडला, जो गुन्हयातील हत्यार शोध पंचनामा (नि.क्र.पी.–५/सा.क्र.२) नुसार जप्त करण्यात आला. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये त्यांनी आरोपी क्रमांक २ रोशन याने कोणताही कबुलीजबाब दिला नव्हता आणि त्याच्याकडुन काहीही जप्त करण्यात आले नसल्याचे स्पष्ट शब्दात नाकारलेले आहे.

२२. उपरोक्त पुराव्याचे विवेचन केले असता पंच साक्षीदाराच्या कथनानुसार आरोपी क्रमांक २ ने वाहन कांढळी नदीकडे घेवुन जाण्यास सांगितले. त्यानुसार ते कांढळी नदीकडे गेले व चाकू गवतातुन काढून देण्यात आला होता, हया बाबी पंचनाम्यात नमूद करण्यात आल्या होत्या असे पंच साक्षीदार सांगतो. तर सदरच्या बाबी पंचनाम्यात नमूद का करण्यात आल्या नाहीत याचे कोणतेही कारण तो सांगु शकलेला नाही. याउलट, तपासी अधिकारी यांच्या कथनानुसार, आरोपी त्यांना कबुलीजबाबनुसार वणा नदीच्या पुलाखाली घेवुन गेला. त्यांनी नदीत चाकूचा शोध घेतला व त्यांना नदीतील एका दगडावर चाकू सापडला, यावरुन पंच साक्षीदार व तपासी अधिकारी यांच्या उलटतपासणीमध्ये चाकू काढून दिल्याचे स्थळ, चाकू मिळुन आलेले स्थळ, चाकू सापडणे, हया बाबी मुळातच परस्परविसंगत साक्षीदारांच्या पुराव्यात आल्यामुळे एकुणच सदरचा कबुलीजबाब तथा गुन्हयातील हत्यार शोध पंचनामा यावर दाट संशय निर्माण होतो.

२३. पंच साक्षीदाराने पोलीसांनी त्याला नगरपरिषद कार्यालयात सांगितले होते की, त्यांना आरोपी क्रमांक २ कडुन चाकू जप्त करायचा आहे ही बाब मान्य केली आहे. यावरुन पोलीसांनी आधीच पंच साक्षीदाराला चाकू जप्तीबाबत सांगितले होते आणि त्यामुळे पंचनाम्याची विश्वासार्हता कमी होते व जप्तीचा पुरावा दुर्बल ठरतो. तसेच आरोपीस लॉकअपमध्ये ठेवताना व बाहेर काढताना लॉकअप रजिस्टरमध्ये नोंद करणे आवश्यक आहे. परंतु तसा कोणताही कागदोपत्री पुरावा किंवा नोंद अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. तसेच माल काढुन दिल्याच्या पंचनामा ज्या ठिकाणावरुन साहित्य काढुन देण्यात आले, त्याठिकाणी तयार करणे अभिप्रेत आहे. अभियोगपक्षाने त्याअनुषंगाने लॉगबुकचा उतारा दाखल करुन सिध्द करणे अपेक्षित होते. परंतु, प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने कोणताही लॉगबुकचा उतारा अभिलेखावर दाखल करुन सिध्द केलेला नाही. तसेच तपासअधिकारी यांनी कबुलीजबाब व माल काढुन दिल्याचे पंचनाम्यावर शिक्का उमटविला नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे एकंदरीतच पोलीसांनी आरोपीचा कबुलीजबाब व त्याआधारे झालेली जप्तीची कारवाई निःसंशयपणे सिध्द केली असे म्हणता येणार नाही.

२४. माननीय सर्वोच्च न्यायालयाने **राधे शाम व ईतर –विरुध्द– राजस्थान शासन, प्रकाशीत २०२३(२) गुन्हा १२८ (सर्वोच्च न्यायालय)** या प्रकरणात असे निष्कर्षित केलेले आहे की, केवळ कथित जप्तीच्या आधारावर दोषसिद्धी टिकवून धरता येत नाही. तर **रेणुकाप्रसाद –विरुध्द– शासन, फौजदारी अपील क्रमांक ३१८९–३१९०/२०२३, फौजदारी अपील क्रमांक ३३९९/२०२४, फौजदारी अपील क्रमांक ८५८६/२०२४, सर्वोच्च न्यायालय, निकाल दिनांक ०९.०५.२०२४** या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने निष्कर्षीत केलेल्या प्रमेयानुसार चौकशीतील विधाने किंवा तपास अधिकाऱ्यांची साक्ष ही आरोपीच्या दोषसिद्धीसाठी पुरेशी ठरत नाही. दोषसिद्धीसाठी न्यायालयीन साक्षीदारांची ठोस व विश्वासार्ह साक्ष आवश्यक आहे; अन्यथा आरोपीस दोषी ठरविता येत नाही असा

निर्वाळा दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात देखील जखमी साक्षीदाराने घटनेबाबत काहीही सांगितलेले नाही तथा जप्ती पंचनामे संशयापलिकडे सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील घटकांशी उपरोल्लेखित सर्वोच्च न्यायालयाने निष्कर्षीत केलेले प्रमेय तंतोतंत जुळते. मात्र, रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.पी.–३०/सा.क्र.४) नुसार तथाकथित जप्त चाकू (एम.ओ.क्र.–१) हा रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविला असता तत्संबंधीचा अहवाल हा 'अनिर्णायक' असल्याने सदरच्या गुन्हयाशी त्याचा परस्परसंबंध स्पष्टपणे दिसुन येत नाही. त्यामुळे, सदरचा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल तथा गुन्हयातील हत्यार शोध पंचनामा (नि.क्र.पी.–५/सा.क्र.२) अभियोगपक्षास कोणत्याही उपयोगाचा ठरणारा नाही. त्याचप्रमाणे जखमी सचिन (सा.क्र.१) याने तथाकथित चाकू (एम.ओ.क्र.–१) कुठेही ओळखलेला नाही, सबब, सदरचा रासायनिक विश्लेषण अहवाल तथा गुन्हयातील हत्यार शोध पंचनामा अभियोगपक्षास पुरक ठरत नाही.

२५. आरोपी क्रमांक ५ हिने नोंदविलेल्या तक्रारीस अनुसरुन, अभियोगपक्षाने तक्रार व छापील प्रथम खबर सिध्द करण्याकरीता स्मिता बिरजु बोरकर (सा.क्र.३) (नि.१०४) हिची साक्ष नोंदविली. तिने तिच्या साक्षीत सांगितले की, सन २०२३ मध्ये, ती पोलीस स्टेशन, सिंदी (रेल्वे) येथे महिला पोलीस हवालदार या पदावर कार्यरत असताना दिनांक १५.०५.२०२३ रोजी, रात्री ८.०० वाजेपासुन दिनांक १६.०५.२०२३ रोजी, सकाळी ८.०० वाजेपावेतो, तिची स्टेशन डायरीला डयुटी होती. दिनांक १६.०५.२०२३ रोजी, सकाळी ५.०० वाजताच्या दरम्यान, आरोपी क्रमांक ५ ने पोलीस स्टेशनला पहाटे ४.३० वाजताच्या दरम्यान, तिच्या पतीने सचिनवर अंगणात दोन अज्ञात पुरुषांकडून एक चाकूसारख्या लोखंडी वस्तूने हल्ला होताना आवाज दिला. त्यांचे चेहरे कपडयाच्या दुपट्टयाने लपवले होते. आवाज दिल्यामुळे ते पळून गेले. सचिन वर्जे जमिनीवर पडलेला आढळला, त्याचे

डोके आणि मानेतून रक्तस्राव झाला होता आणि त्याला गंभीर जखमा होत्या. त्यानंतर, तिने समीर टेंभरे आणि शेजारी महेश दहिलिंगे यांना बोलविले व जखमीचा भाऊ पिंटू वर्जे याला माहिती दिली. आरोपी क्रमांक ५ ने दाखल केलेली तक्रार (नि.क्र.पी.–६/सा.क्र.३) तिने नोंदवुन घेतली होती. त्यानुसार, तिने सहाय्यक पोलीस निरीक्षक, सोनवणे याच्या निर्देशानुसार छापील प्रथम खबर (नि.क्र.पी.–७/सा.क्र.३) नोंदविली. बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये आरोपी क्रमांक ५ ने तक्रार नोंदवितांना सांगितले होते की, हल्लेखोर हे अनोळखी ईसम होते हे मान्य केले आहे.

२६. उपरोक्त पुराव्याचे विवेचन केले असता असे दिसुन येते की, आरोपी क्रमांक ५ ने दाखल केलेल्या तक्रारीनुसार छापील प्रथम खबर नोंदविण्यात आली. जेव्हा जखमीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ अंतर्गतचे बयान नोंदविल्यानंतर आरोपी क्रमांक ५ चा देखील गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आणि म्हणुन तिला आरोपी करण्यात आले. आरोपी क्रमांक ५ ने गुन्हा लपविण्याच्या दृष्टीने, जखमीने सांगितल्यानुसार, सदरची तक्रार दिली याविषयी कोणताही ठोस पुरावा अभियोगपक्षाने आणलेला नाही. आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी जखमीला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आणि आरोपींनी गुन्हयातील रक्ताने माखलेले कपडे धुवून पुरावा नाहीसा करण्याची तजवीज केली याविषयीचा कोणताही पुरावा नाही. तसेच अभियोगपक्षाचा मुख्य साक्षीदार, जखमी सचिन वर्जे (सा.क्र.१) याने घटनेबाबत अभियोगपक्षाला समर्पक अशी साक्ष न दिल्यामुळे तक्रार (नि.क्र.पी.–६/सा.क्र.३) आणि छापील प्रथम खबर (नि.क्र.पी.–७/सा.क्र.३) चा कोणताही भरीव उपयोग अभियोगपक्षास आरोपींचे दोषसिध्दीसाठी उपयोगाचे नाहीत.

२७. जखमीने स्वत:च अभियोगपक्षाला सहकार्य केलेले नसल्यामुळे

आरोपींविरूध्दचे आरोप सिध्द करण्यास अभियोगपक्ष अपयशी ठरले आहे. जखमी सचिन वर्जे (सा.क्र.१) याने अभियोगपक्षाच्या खटल्यापुष्टयर्थ साक्ष न दिल्यामुळे आणि आरोपींविरूध्द काहीही न सांगितल्यामुळे, तपासी अधिकारी यांची साक्ष नोंदविली असली तरी त्यामधून काहीही साध्य होणारे नव्हते. तपासी अधिकारी यांचा पुरावा हा केवळ परिपोषक पुराव्याचा भाग असतो आणि तो प्राथमिक/ठोस पुराव्याची जागा घेऊ शकत नाही. जखमी साक्षीदारानेच न्यायालयात आरोपींविरुध्द बयान दिलेले नाही, त्यामुळे हत्या करण्याचा प्रयत्न सिध्द झाला नाही. तसेच कट सिध्द करण्यासाठी दोन किंवा अधिक आरोपींमध्ये गुन्हा करण्याचा करार झाल्याचे ठोस पुरावे देखील अभियोगपक्ष अभिलेखावर आणु शकलेला नाही. तसेच आरोपींना गुन्हयाची माहिती होती व त्यांनी जाणूनबुजून पुरावा लपविला याबाबत देखील ठोस पुरावे देखील अभियोगपक्ष अभिलेखावर आणु शकलेला नाही. वास्तविक पाहता, तपासी अधिकारी यांचा न्यायालयासमोरील पुरावा महत्वाच्या बाबींवर विसंगत स्वरुपाचा आहे. त्यामुळे, आरोपींविरुध्द थेट गुन्हयात गोवणारा पुरावा अभिलेखावर आणण्यात अभियोगपक्ष असफल ठरलेला आहे.

२८. बचावपक्षाने जखमीचे जखमांचे प्रमाणपत्र (निशाणी सी–१), पोलीस माहिती पत्रक (निशाणी सी–२), न्यायवैद्यक घटनास्थळ पंचनामा (निशाणी सी–४), जखमांचा अहवाल (निशाणी सी–५), प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेला वस्तु व नमुने पाठविल्याबाबतचा विहीत नमुन्यातील फॉर्म (निशाणी सी–६), दिनांक १७.०५.२०२३ रोजीचे जप्तीपत्रक (निशाणी सी–७), दिनांक १६.०५.२०२३ रोजीचा मालमत्ता शोध व जप्तीचे नमुने (निशाणी सी–८ व ९), दिनांक २२.०५.२०२३ रोजीचे जप्ती पत्रक (निशाणी सी–१०), जखमीचे रुग्णालयातुन सुट्टी झाल्याबाबतची समरी (निशाणी सी–११), वैद्यकीय–कायदेशीर अंतिम जखमांचा अहवाल (निशाणी सी–१२), आरोपींकडुन कपडे व मोबाईल जप्त केल्याबाबतचे जप्ती पंचनामे (निशाणी सी–१३ ते १८) इत्यादि कागदपत्रे खटल्याचे

प्रक्रियेदरम्यान मान्य केलेले आहेत. जेव्हा जखमीनेच स्वत: घटना घडल्याचे नाकारून अभियोगपक्षाला सहकार्य न केल्यामुळे तक्रार सिध्द झाली नाही आणि जेव्हा आरोपींविरूध्द कोणताही ठोस पुरावा नाही, तेव्हा उपरोक्त कागदपत्रे आरोपींचा गुन्हयाशी संबंध जोडून त्यांच्याविरूध्दचे आरोप सिध्द करण्यास अभियोगपक्षाला उपयोगी ठरत नाहीत.

२९. तपासी अधिकारी राजु मुरलीधर सोनपितळे (सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यात सर्व मुद्देमाल व नमुने रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविल्याचे सांगितले असुन त्यांना एकुण सहा रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.पी.–३० ते ३५/सा.क्र.४) नुसार प्राप्त झाल्याचे सांगितले.

३०. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३०/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ कापडी पट्टीचे लेबल अ–१, नि.क्र.४ काचेच्या बाटलीच्या लेबलचे तुकडे अ–४, आणि नि.क्र.१८ धातुच्या चाकूचे लेबल जी–१ हे रक्ताने माखलेले आहेत आणि नि.क्र.२ पाकिटात टाकलेल्या मातीचे लेबल अ–२ रक्ताने माखलेले आहे, नि.क्र.१, २ आणि ४ हे मानव प्रजातीचे असुन त्याचा रक्तगट ‘अ’ आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३०/सा.क्र.४) नुसार नि.क्र.५ फुल लोअर पॅन्ट लेबल ब–१, नि.क्र.७ दुपट्टा लेबल बी–३, आणि नि.क्र.८ दुपट्टा बी–४ यावर ठिकठिकाणी सुमारे ०.१ सेमी. व्यासापासुन ते मोठया आकारापर्यतचे असंख्य रक्ताचे डाग पसरलेले आहेत, नि.क्र.१० हाफ टी–शर्ट लेबल सी–१ यावर ठिकठिकाणी सुमारे १ सेमी. ते २ सेमी. व्यासाचे मध्यम प्रमाणात रक्ताचे डाग पसरलेले आहेत आणि नि.क्र.११ दुपट्टा लेबल सी–२ यावर मुख्यतः मधल्या भागावर सुमारे ०.१ सेमी. ते ५ सेमी. व्यासाचे काही रक्ताचे डाग आहेत. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३०/सा.क्र.४) नुसार नि.क्र.६ अंतर्वस्त्र लेबल बी–२ आणि नि.क्र.१७ फुल पॅन्ट लेबल एफ–२ काही ठिकाणी रक्ताने माखलेले आहेत, नि.क्र.९ सॅण्डो बनियान

लेबल ब–५ रक्ताने जवळजवळ भिजलेले आहे, नि.क्र.१६ फुल टी–शर्ट लेबल एफ–१ रक्ताने माखलेले आहे आणि त्याच्या उजव्या बाहीचा आतील भाग धुतलेला दिसतो.

३१. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३१/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ व २ टेस्ट टयुबमधील आरोपी निखील वासुदेव बालपांडे याचे कापडात गुंडाळलेले रक्त 'अ' रक्तगटाचे आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३२/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ व २ टेस्ट टयुबमधील आरोपी मुकिंदा बापुरावजी गायधने याचे कापडात गुंडाळलेले रक्त 'ओ' रक्तगटाचे आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३३/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ व २ टेस्ट टयुबमधील आरोपी रोशन मारोतराव गायधने याचे कापडात गुंडाळलेले रक्त 'ओ' रक्तगटाचे आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३४/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ व २ टेस्ट टयुबमधील आरोपी कुमार चंद्रलाल उधावने याचे कापडात गुंडाळलेले रक्त 'अ' रक्तगटाचे आहे. रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.३५/सा.क्र.४) नुसार नि.क्र.१ व २ टेस्ट टयुबमधील जखमी सचिन गणेशराव वर्जे याचे कापडात गुंडाळलेले रक्त 'अ' रक्तगटाचे आहे.

३२. अभियोगपक्षाने उपरोक्त मुद्देमाल वाहक साक्षीदाराची साक्ष देखील याप्रकरणी नोंदविलेली नाही. सदरचे प्रकरणी, जप्त मुद्देमालाचा ताबा कोणाकडे होता, कोणाकडून कोणाकडे हस्तांतरित झाला, आणि त्या वस्तूंची सुरक्षितता व अखंडता कशी राखली गेली व त्यामध्ये कोणतीही छेडछाड झालेली नव्हती; याबाबतची साखळी (Chain of custody) अभियोगपक्षाने सिध्द केलेली नाही. वरील परिस्थिती पाहता, जप्त नमुने तथा वस्तूंमध्ये छेडछाड झाली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रासायनिक विश्लेषण अहवाल तसेच वैज्ञानिक पुरावा आरोपींना प्रस्तुत गुन्हयाशी जोडण्यासाठी अभियोगपक्षाला उपयोगी ठरणारा

नाही. याप्रकरणी जप्त मुद्देमालाची साखळी निर्विवादपणे सिध्द करण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरल्यामुळे रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.पी.–३०/सा.क्र.४) आरोपीच्या कपडयांवर जखमीचे रक्ताचे डाग आले असले तरीही अभियोगपक्षाचे कथनास पुष्टी देणारा ठरत नाही.

३३. अशाप्रकारे, रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.पी.–३० ते ३५/सा.क्र.४) देखील आरोपींचा गुन्हयाशी परस्परसंबंध जोडण्यास अभियोग पक्षाला उपयोगी ठरत नाहीत. जेव्हा तथाकथित घटनाच अभियोग पक्षाने सिध्द केलेली नाही, तेव्हा रासायनिक विश्लेषण अहवालांचा आरोपींविरूध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी काहीही उपयोग होणार नाही.

३४. याप्रकरणी, अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता एका बाजुला तथाकथित चाकू (एम.ओ.क्र.–१) संबंधीची जप्ती संशयास्पद आहे तर दुस–या बाजुला तत्सबंधीचा क्वेरी अहवाल (आर्टीकल–सी) अभियोगपक्षाने पुराव्याद्वारे सिध्द केलेला नाही, तर रासायनिक विश्लेषण अहवाल (नि.क्र.पी–३०/सा.क्र.४) हा तथाकथित चाकू संबंधाने 'अनिर्णायक' आहे. घटनास्थळ पंचनाम्यानुसार घटना ही आरोपी क्रमांक ५ च्या घरी अंगणात घडल्याचे दिसुन येते. सदरच्या बाबीस साक्षीदारांच्या पुराव्यात पुष्टी मिळालेली आहे. घटनेच्या वेळी आरोपी क्रमांक ५ ने आजुबाजूला जोरात आवाज मारुन समिर टेंभरे याला झोपेतुन उठवुन व बाजुला राहणारा महेश दहिलिंगे यांना आवाज देवुन बोलविले तसेच पिंटू वर्जे यास माहिती दिली. यावरुन घटनास्थळ हे लोकवस्तीतील असल्याचे दिसुन येते. मात्र, याप्रकरणी अभियोगपक्षाने वरील दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा अन्य आजुबाजूचे साक्षीदारांना तपासलेले नाही. अभियोगपक्षाने कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारास याप्रकरणी तपासलेले नाही.

३५. तपासी अधिकारी याच्या कथनानुसार तपासादरम्यान आरोपींकडुन

जप्त करण्यात आलेल्या मोबाईलच्या अनुषंगाने त्याबाबतचे सी.डी.आर. व एस.डी.आर. अभिलेखावर सादर केलेले आहेत, मात्र, भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदीनुसार अभियोगपक्षाने सिध्द केलेले नाही. नमूद करण्यासारखी बाब अशी की,सदर प्रकरणी आरोपींची ओळखपरेड करण्यात आल्याचे तपासी अधिकारी (सा.क्र.४) कथन करतात. मात्र, सचीन (सा.क्र.१) हा केवळ आरोपी क्रमांक १ व ५ यांना ओळखतो. आरोपी क्रमांक २ ते ४ यांना ओळखत नाही. त्याला मारहाण झाल्याची घटना कोणी नोंदवली व त्याच्यावर कोणी हल्ला केला हे त्याला माहिती नाही तर घटनेबद्दल त्याला काहीही माहिती नसल्याचे त्याचे कथन आहे. अभियोगपक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये सदर साक्षीदाराने तो दिनांक ०७.०६.२०२३ पर्यत रुग्णालयात भरती होता व त्याला ओळखपरेडसाठी तुरुंगात बोलविण्यात आले होते. त्याने आरोपी क्रमांक ३ व ४ यांना ओळखले. मात्र, ओळखपरेड मेमोरेंडवरील सही त्याची नाही असे या साक्षीदाराने मान्य केलेले आहे. याउलट, बचावपक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासणीमध्ये ओळखपरेड चाचणीच्या आधी त्याने वर्तमानपत्रात आरोपींचे छायाचित्र पाहीले होते व तो हल्लेखोरांना ओळखत नसल्याची बाब स्पष्टपणे मान्य केलेली आहे. यावरुन, सदर साक्षीदाराने ओळखपरेड विषयीचा विसंगत पुरावा दिलेला असुन ओळखपरेड मेमोरेंडम हे अभियोगपक्षाने योग्य साक्षीदार तपासुन पुराव्याने सिध्द केलेले नाही. त्यामुळे, भारतीय पुरावा कायद्याचे कलम ९ प्रमाणे आरोपींची ओळखपरेड संशयापलिकडे जावुन सिध्द केली असे म्हणता येणार नाही. विशेष म्हणजे जखमी स्वतःच अभियोगपक्षास आरोपीच्या ओळखीबाबत समर्थन करीत नाही.

३६. याप्रकरणी, तपासी अधिकारी यांचा पुरावा मुख्यतः औपचारिक स्वरूपाचा असून तपास अधिकाऱ्याचे साक्षीपुरावे केवळ स्वतःहून आरोपीचा दोष सिद्ध करू शकत नाहीत, जोपर्यंत विश्वासार्ह व ठोस पुरावे उपलब्ध नसतात, तर अन्य कोणताही साक्षीदार तपासी अधिकारी यांच्या पुराव्याला पुष्टी देत नाही.

अभियोगपक्षातर्फे सादर करण्यात आलेले मूलभूत पुरावे, जसे की जखमी व्यक्तीची साक्ष, पंच साक्षीदाराची साक्ष, अविश्वसनीय व अपुरी आहे. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यात मुलभूत त्रुटी आहेत. सदर प्रकरणात, नोंदविलेले पुरावे महत्त्वाच्या विसंगतींनी ग्रस्त आहेत व विश्वासार्हतेचा अभाव आहे. संपूर्ण पुराव्याचे एकत्रित व सर्वांगीण मूल्यांकन केल्यानंतर अभियोगपक्षाला आरोपींना कथित गुन्ह्याशी निश्चितपणे जोडणारी ठोस, सातत्यपूर्ण व विश्वासार्ह परिस्थितींची साखळी सिद्ध करण्यात अपयश आले आहे. सादर केलेला पुरावा हा फौजदारी खटल्यात, विशेषतः भारतीय दंड संहितेच्या कलम ३०७ अंतर्गत गंभीर आरोप असलेल्या खटल्यात, अपेक्षित असलेला विश्वास निर्माण करीत नाही.

३७. याव्यतिरिक्त, कथित पुष्टीकारक पुरावे, ज्यामध्ये वैद्यकीय व न्यायवैज्ञानिक पुरावे समाविष्ट आहेत, ते आरोपींचा सहभाग याप्रकरणी जखमी सचिन (सा.क्र.१) याने अभियोगपक्षाचे कथनास पुष्टी मिळेल अशी साक्ष दिलेली नसल्यामुळे निश्चितपणे सिद्ध करीत नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपींना गुन्ह्याशी जोडणारा कोणताही दोषारोपात्मक पुरावा तथा आरोपींची दोषसिध्दी, स्पष्ट ओळख सिध्द करण्यात अपयश आलेले असल्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

३८. आरोपींनी फौजदारीपात्र कट रचून जखमीला जीवे ठार करण्याचा प्रयत्न केल्याचा, आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी जखमीला ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचा आणि आरोपींनी गुन्हयातील रक्ताने माखलेले कपडे धुवून पुरावा नाहीसा करण्याची तजवीज केली या आरोपांसंदर्भात, जखमीने स्वत:च घटना घडली नसल्याचे सांगितले आहे आणि अभियोगपक्षातर्फे घेण्यात आलेल्या त्यांच्या उलटतपासात त्यासंदर्भात त्यांनी कोणतीही कबूली दिलेली नाही. अशा परिस्थितीत, गुन्हा घडला व त्यामध्ये आरोपींचा सहभाग होता, हे दाखवण्यासाठी कोणतीही पुष्टी

देणारा पुराव्याचा अंश नाही. अशाप्रकारे, आरोपींचा तथाकथित घटनेशी संबंध प्रस्थापित करण्यास अभियोगपक्ष पूर्णपणे अयशस्वी ठरलेले आहे.

३९. अभियोगपक्षाच्या एकंदरित पुराव्याचे अवलोकन करता, जखमी या महत्वाच्या साक्षीदारानेच घटनेबाबत काहीही न सांगितल्यामुळे व तक्रारच संशयापलिकडे सिध्द न झाल्यामुळे, घटनेबाबत संशय निर्माण होतो. आरोपींविरूध्द त्यांचा घटनेशी संबंध जोडण्याइतपत परिस्थितीजन्य पुरावा देखील न्यायालयापुढे उपलब्ध नाही. त्यामुळे आरोपींविरूध्दचे दोषारोप सिध्द होत नाहीत. अभियोगपक्ष आरोपींविरूध्द संहितेचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ प्रमाणे दोषारोप सिध्द करण्यास अपयशी ठरलेला आहे. म्हणून मी मुद्दे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ बाबत :–</u>**

४०. मुद्दे क्रमांक १ ते ४ चे निष्कर्षांनुसार आणि उपरोक्त चर्चेवरून अभियोगपक्ष आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ प्रमाणे दोषारोप सिध्द करण्यास अयशस्वी ठरलेले आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. या प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक जुनी वापरती लाल काळया रंगाची बजाज पल्सर मोटरसायकल नोंदणी क्रमांक एम.एच.–३२/ए.यु.–०२८२ न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक २१.०६.२०२३ रोजी सुपूर्दनाम्यावर देण्यात आलेली आहे, करीता सदरहु मोटरसायकलचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करणे संयुक्तिक होईल. जप्त मुद्देमाल ओप्पो कंपनीचा एफ–२१–एस., प्रो काळया पांढ–या रंगाचा मोबाईल व एक ओप्पो कंपनीचा काळया पांढ–या रंगाचा रेनो–६, ५–जी मोबाईल हे दोन्ही मोबाईल न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक १२.०८.२०२३ रोजी सुपूर्दनाम्यावर देण्यात आलेले आहे, करीता सदरहु मोबाईलचा ताबा अपिल

कालावधीनंतर कायम करणे संयुक्तिक होईल.

४१. या प्रकरणातील जप्त मुद्देमाल; आरोपी कुमार चंद्रलाल उधवानी याच्याकडुन जप्त करण्यात आलेला एक विवो कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल हॅण्डसेट, आरोपी मुकिंदा गायधने याच्याकडुन जप्त करण्यात आलेला एक कार्बन कंपनीचा कि पॅड असलेला काळया लाल रंगाचा साधा मोबाईल, उपरोक्त वर्णित दोन्हीही मोबाईल हॅन्डसेट अपील कालावधीनंतर संबंधित आरोपीस कागदपत्राच्या पडताळणीअंती परत करणे संयुक्तिक होईल. तसेच जप्त मुद्देमाल; एक काळया रंगाचा चाकू अपील कालावधीनंतर जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविणे संयुक्तिक होईल आणि अन्य जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करणे संयुक्तिक होईल. सबब, मी मुद्दा क्रमांक ५ च्या उत्तराबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपी क्रमांक (१) मुकिंदा बापुराव गायधने, आरोपी क्रमांक (२) रोशन मारोतराव गायधने, आरोपी क्रमांक (३) निखील वासुदेव बालपांडे, आरोपी क्रमांक (४) कुमार चंद्रलाल उधवानी व आरोपी क्रमांक (५) सुरेखा मुकिंदा गायधने यांची भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब व ३०७ सह कलम ३४ आणि आरोपी क्रमांक २ ते ४ विरुध्द कलम २०१ अन्वयेच्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपींचे बंधपत्र आणि जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) या प्रकरणातील एक जुनी वापरती लाल काळया रंगाची बजाज पल्सर मोटरसायकल नोंदणी क्रमांक एम.एच.–३२/ए.यु.–०२८२ न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक २१.०६.२०२३ रोजी सुपूर्दनाम्यावर देण्यात आलेली आहे, करीता सदरहु मोटरसायकलचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

४) जप्त मुद्देमाल; ओप्पो कंपनीचा एफ–२१–एस., प्रो काळया पांढ–या रंगाचा मोबाईल व एक ओप्पो कंपनीचा काळया पांढ–या रंगाचा रेनो–६, ५–जी मोबाईल हे दोन्ही मोबाईल न्यायालयाच्या आदेशान्वये दिनांक १२.०८.२०२३ रोजी सुपूर्दनाम्यावर देण्यात आलेले आहे, करीता सदरहु मोबाईलचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येतो.

५) जप्त मुद्देमाल; आरोपी कुमार चंद्रलाल उधवानी याच्याकडुन जप्त करण्यात आलेला एक विवो कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल हॅण्डसेट, आरोपी मुकिंदा गायधने याच्याकडुन जप्त करण्यात आलेला एक कार्बन कंपनीचा कि पॅड असलेला काळया लाल रंगाचा साधा मोबाईल, उपरोक्त वर्णित दोन्हीही मोबाईल हॅन्डसेट अपील कालावधीनंतर संबंधित आरोपीस कागदपत्राच्या पडताळणीअंती परत करण्यात यावे.

६) या प्रकरणातील जप्त मुद्देमाल, एक काळया रंगाचा चाकू अपील कालावधीनंतर जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्याकडे नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावा.

७) अन्य जप्त मुद्देमाल मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

८) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) अन्वये वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा याचिका दाखल झाल्यास हजर होण्याचा दृष्टीकोनातून प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/– (पंचवीस हजार) चे वैयक्तिक बंधपत्र आणि तेवढ्याच रकमेचा जातमुचलका दाखल करावा.

HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD

Digitally signed by HEMANT BHAGWANTRAO GAIKWAD
Date: 2026.05.02 16:46:44 +0530

वर्धा (हेमंत भ. गायकवाड)

दिनांक : ०२.०५.२०२६. सत्र न्यायाधीश, वर्धा

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त मुळ न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर शब्द–नि–शब्द एकसारखा व तंतोतंत जुळणारा आहे.

(प्रशांत ना. शेटे)

लघुलेखक ग्रेड–३